# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

(सेवागौरव समारंभ- दि. २९-०६-२०२४)

**परिपत्रक क्र. सा.प्र./२०२४/**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, **१)डॉ. ईश्वरसिंग रायभान मंझा- उपकुलसचिव, २)श्री.अप्पासाहेब नारायण वाणी- वरिष्ठ सहायक, ३)श्री.मच्छिंद्र रावसाहेब जगदाळे- प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Laboratory Technician)** हे नियत वयोमानानुसार दिनांक ३०-०६-२०२४ रोजी विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.

उपरोक्त सेवानिवृत्त होणारे कर्मचारी यांचा सेवागौरव समारंभ मा.कुलगुरु महोदय यांच्या हस्ते दिनांक २९-०६-२०२४ रोजी सायं. ०४:०० वाजता महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित करण्यात आलेला आहे.

सबब, सेवागौरव समारंभास सर्वांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर ४३१ ००४ )(
संदर्भः- सा.प्र./२०२४/219 )(
दिनांकः- २०-०६-२०२४ )(

**कुलसचिव**

या परिपत्रकाची प्रत **कार्यकारी अभियंता**, स्थावर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन विनंती करण्यात येते की, दि. २९-०६-२०२४ रोजी सायं. ४.०० वाजता महात्मा फुले सभागृहामध्ये **माईक व्यवस्था** करण्यासाठी संबंधितास आपल्या स्तरावर आदेशित करावे.

या परिपत्रकाची प्रत **संचालक,** युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सेवागौरव समारंभ आयोजित केल्याबद्दल विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांना SMS द्वारे अवगत करण्यात यावे. तसेच सदरील परिपत्रक **विद्यापीठ संकेतस्थळावर** उपलब्ध करुन द्यावे.

या परिपत्रकाची प्रत **उपकुलसचिव,** आस्थापना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्त सेवागौरव कार्यक्रमाचे **सूत्रसंचलन** करुन सहकार्य करावे.

**कुलसचिव**